सन २०१७-१८ च्या खरीप हंगामातील अंतिम पैसेवारी ५० पैशांपेक्षा कमी असलेल्या गावांमध्ये विविध उपाययोजना जाहीर करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महसुल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांकः- एससीवाय-२०१७/प्र.क्र.२७०/म-७
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांकः- २८ फेब्रुवारी, २०१८

<u>वाचाः</u>- १) शासन निर्णय, महसुल व वन विभाग, क्र.:-एससीवाय-२०१३/प्र.क्र.२०७/ म-७ दिनांक ३ नोव्हेंबर,२०१५
२) शासन निर्णय, महसुल व वन विभाग, क्रः- संकीर्ण-२०१७/प्र.क्र.१७३/ २०१७/म-७, दिनांक- ७ ऑक्टोबर,२०१७
३) शासन निर्णय, महसुल व वन विभाग, क्रः- संकीर्ण-२०१७/प्र.क्र.१७३/ २०१७/म-७, दिनांक- ३० ऑक्टोबर, २०१७

<u>प्रस्तावनाः</u>

संदर्भाधीन शासन निर्णय क्र. २ अन्वये दुष्काळ घोषित करण्याबाबत कार्यपध्दती विहित करण्यात आली आहे. त्यानुसार संदर्भाधीन शासन निर्णय क्र. ३ येथील शासन निर्णयान्वये सन २०१७ च्या खरीप हंगामामध्ये राज्यातील गोंदिया जिल्ह्यातील गोंदिया, तिरोडा व गोरेगांव या तीन तालुक्यात मध्यम स्वरूपचा दुष्काळ जाहीर करून विविध उपाययोजना लागू करण्यास शासन मंजूरी देण्यात आली आहे. सदर उपाययोजना या सन २०१७-१८ खरीप हंगामात अंतीम पैसेवारी ५० पैशांपेक्षा कमी आलेल्या १४६७९ गावांमध्ये लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णयः

राज्यातील सन २०१७-१८ च्या खरीप हंगामातील अंतिम पैसेवारी ५० पैशांपेक्षा कमी असलेल्या विविध जिल्ह्यांतील १४६७९ गावांमध्ये (परिशिष्ट-अ) खालील सवलती लागू करण्यास शासन मंजूरी देण्यात येत आहे.

१) जमीन महसूलात सूट.
२) सहकारी कर्जाचे पुनर्गठन.
३) शेतीशी निगडीत कर्जाच्या वसूलीस स्थगिती.
४) कृषी पंपाच्या चालू विजबिलात ३३.५% सूट.
५) शालेय/महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परिक्षा शुल्कात माफी.
६) रोहयो अंतर्गत कामाच्या निकषात काही प्रमाणात शिथिलता.
७) आवश्यक तेथे पिण्याचे पाणी पुरविण्यासाठी टँकर्सचा वापर.
८) टंचाई जाहीर केलेल्या गावात शेतक-यांच्या शेतीच्या पंपाची वीज जोडणी खंडीत न करणे.

२. या आदेशान्वये देण्यात येणा-या विविध सवलतीपोटीचा आर्थिक भार संबंधित प्रशासकीय विभागांनी उचलावा व त्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून द्यावा. त्यानुसार या प्रकरणी पुढील उचित कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल या विभागास सादर करण्यात यावा.

३. संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांनी सोबतच्या परिशिष्ट-अ मध्ये खरीप २०१७ अंतीम पैसेवारी ५० पैशांपेक्षा कमी असलेल्या १४६७९ गावांमध्ये उपरोक्त उपाययोजना अंमलात आणण्यास प्राधिकृत करण्यात येत आहे. त्यांनी तातडीने आवश्यक उपाययोजना अंमलात आणाव्यात.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१८०३०११११३४३३९३१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Subhash Hanmant Umaranikar

Digitally signed by Subhash Hanmant Umaranikar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d5ea2bb9565eeb9b02d583f130371941a03fc5d98df65d3daafe66960a165024, serialNumber=596a24adfcfcd3edb4245812c0eaccecdf4de3ec6a308b42a682a980bca4db38, cn=Subhash Hanmant Umaranikar
Date: 2018.03.01 11:34:56 +05'30'

(सुभाष उमराणीकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव
२) मा. मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव (सर्व)
३) सर्व लोकसभा सदस्य/राज्यसभा सदस्य (महाराष्ट्रातील)
४) सर्व विधानसभा सदस्य/विधान परिषद सदस्य
५) मा. मुख्य सचिव यांचे उप सचिव
६) अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
७) प्रधान सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग
८) अपर मुख्य सचिव (मदत व पुनर्वसन)
९) प्रधान सचिव (महसूल), महसुल व वन विभाग
१०) अमुस/प्र.स.(उर्जा)/पाणी पुरवठा/सहकार/जलसंधारण व रोहयो
११) आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
१२) महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र , मुंबई/नागपूर
१३) महालेखापाल-१/२ (लेखा परिक्षा), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर
१४) सर्व विभागीय आयुक्त
१५) सर्व विभागीय कृषि सह संचालक
१६) जिल्हाधिकारी, सर्व
१७) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व
१८) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, सर्व

१९) जिल्हा कोषागार अधिकारी, सर्व
२०) वित्त विभाग, व्यय-९/अर्थसंकल्प कक्ष/अर्थोपाय कक्ष), मंत्रालय, मुंबई
२१) महसुल व वन विभाग (म-११/म-३), मंत्रालय, मुंबई-३२
२२) सर्व सहसचिव/उपसचिव कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
२३) निवड नस्ती म-७ कार्यासन

शासन निर्णय क्र एससीवाय-२०१७/प्र.क्र.२७०/म-७

दिनांक- २८ फेब्रुवारी, २०१८

सन २०१७-१८ सालातील खरीप पिकांच्या अंतीम पैसेवारीचा गोषवारा

“परिशिष्ट - अ”

अ.क्र.	विभाग	जिल्हा	अंतीम पैसेवारी जाहीर केलेली गावे	५० पैशांपेक्षा कमी पैसेवारी असलेली गावे	५० पैशांपेक्षा जास्त पैसेवारी असलेली गावे
१	कोकण	ठाणे	८९१	०	८९१
		पालघर	९७४	०	९७४
		रायगड	१८९५	०	१८९५
		रत्नागिरी	१५१२	०	१५१२
		सिंधुदुर्ग	७३३	०	७३३
	एकूण		**६००५**	**०**	**६००५**
२	नाशिक	नाशिक	१६७७	०	१६७७
		धुळे	५९६	१८०	४१६
		नंदुरबार	८५६	०	८५६
		जळगांव	१५०२	८१४	६८८
		अहमदनगर	५८२	८	५७४
	एकूण		**५२१३**	**१००२**	**४२११**
३	पुणे	पुणे	१२९८	०	१२९८
		सातारा	१४९५	१६	१४७९
		सांगली	६३१	२८५	३४६
		सोलापूर	प्रामुख्याने रब्बी जिल्हा असल्याने खरीप पिकांची पैसेवारी जाहीर केली जात नाही.		
		कोल्हापूर	१२१२	०	१२१२
	एकूण		**४६३६**	**३०१**	**४३३५**
४	औरंगाबाद	औरंगाबाद	१३५४	१३५४	०
		जालना	९७१	३५	९३६
		परभणी	८४९	८४९	०
		हिंगोली	७०७	०	७०७
		नांदेड	१५६२	११६८	३९४
		बीड	१४०२	०	१४०२
		लातूर	९४३	१७१	७७२
		उस्मानाबाद	७३७	०	७३७
	एकूण		**८५२५**	**३५७७**	**४९४८**

अ.क्र.	विभाग	जिल्हा	पैसेवारी जाहीर केलेली गावे	५० पैशांपेक्षा कमी पैसेवारी असलेली गावे	५० पैशांपेक्षा जास्त पैसेवारी असलेली गावे
५	अमरावती	अमरावती	१९६३	१९६३	०
		अकोला	९९०	९९०	०
		यवतमाळ	२०४९	२०४९	०
		वाशिम	७९३	७७४	१९
		बुलडाणा	१४२०	७४८	६७२
	एकूण		**७२१५**	**६५२४**	**६९१**
६	नागपूर	नागपूर	१७८७	०	१७८७
		वर्धा	१३३९	०	१३३९
		भंडारा	८४३	५४४	२९९
		गोंदिया	९१९	७७१	१४८
		चंद्रपूर	१७९४	१७९४	०
		गडचिरोली	१४७९	१६६	१३१३
	एकूण		**८१६१**	**३२७५**	**४८८६**
राज्याची एकूण			**३९७५५**	**१४६७९**	**२५०७६**